रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

जगद्गुरुकृती हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# प्रस्ताव तुम्ही द्या, मंजुरी आम्ही आणू

## रावसाहेब दानवे यांचे प्रशासनाला आदेश; खोतकरांकडूनही विकासाची साथ

**जालना । प्रतिनिधी -** निवडणूक संपली की मतभेद संपले पाहिजेत. आगामी काळात जालना शहराचा सर्वांगीण विकास आमदार अर्जुनराव खोतकर यांना सोबत घेत महायुतीच्या माध्यमातूनच करू अशी, निःसंदिग्ध ग्वाही माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी दिली तर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, आमच्यात कधीच मनभेद नव्हते. किरकोळ मतभेदही दूर झाले असून दोघेही एकत्र येत शहराचा विकास साधू असे स्पष्ट केले.

आ. अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या बालाजी चौक ते राजुर चौफुली (ढवळेश्वर मार्गे) या सुमारे १५ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्याचे उद्घाटन रावसाहेब पाटील दानवे यांच्याहस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी आमदार अर्जुनराव खोतकर हे होते.

यावेळी बोलताना माजी केंद्रीय मंत्री श्री.दानवे म्हणाले की, जालना शहर आणि जिल्ह्यातील प्रमुख रस्त्यांची कामे बऱ्यापैकी झाली आहेत. सोलापूर, जळगाव, संभाजीनगर, नागपूर, देऊळगाव राजा अशा शहराच्या चहूबाजूने नॅशनल हायवे झाले आहेत. जालन्याची कनेक्टिव्हिटी चहूबाजूने वाढली आहे. राजुर ते भोकरदन आणि विशाल कॉर्नर ते बस स्थानक या रस्त्याचे चार पदरी काम होणे आवश्यक आहे. यासंदर्भात प्रस्ताव दाखल करण्याचे निर्देशही त्यांनी उपस्थित कार्यकारी अभियंता श्रीमती स्मिता पवार यांना दिले. तुम्ही प्रस्ताव दाखल करा मी आणि अर्जुनराव खोतकर मिळून मंजुरी आणू ,असे सांगितले. जालना शहराचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी मी आणि अर्जुनराव महायुती म्हणूनच काम करणार आहोत. या संदर्भातही त्यांनी उपस्थित महापौर, उपमहापौर आणि पालिकेतील पदाधिकाऱ्यांना निधी वाटप करताना सर्व प्रभागांना समान निधी द्यावा अशा स्पष्ट सूचनाही केल्या. आपल्या

विनोदी शैलीत बोलताना माजी केंद्रीय मंत्री श्री. दानवे म्हणाले की, ढवळेश्वरचा रस्ता झाला म्हणजे जालना ते भोकरदन जाणे सोपे होईल! जालना आणि भोकरदनच्या मध्ये राजुर आहे. एकदा गणपतीसमोर एकीची आरती करू असे सांगत त्यांनी, आम्ही दोघेही मनाने एकत्र आल्याचे सुतोवाच केले. यावर महायुतीच्या उपस्थित कार्यकर्त्यांनी टाळ्या वाजवून दाद दिली.





**मनपाच्या प्रस्तावांना मंजुरीसाठी प्रयत्न करणार : आ. खोतकर**

यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, बालाजी चौक ते ढवळेश्वर मार्गे राजुर चौफुली पर्यंतचा रस्ता अत्यंत खराब झालेला होता. या रस्त्यावरून चालणे देखील मुश्किल झाले होते. लोकांची तीव्र मागणी लक्षात घेऊन आपण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची नागपूरला जाऊन भेट घेतली. या रस्त्याचे काम होणे किती महत्त्वाचे आहे हे लक्षात आणून दिले आणि नितीनजींनी तात्काळ या रस्त्यास मंजुरी देऊन १५ कोटी रुपयांचा निधी देखील मंजूर केला. आज या रस्त्याचे उद्घाटन होत असल्याचा मला विशेष आनंद होत आहे. तसेच भास्करआबा दानवे यांच्या वार्डातील हा रस्ता होत असल्याचे वेगळे समाधानही आहे. भोकरदनकडे जाणाऱ्या या रस्त्यामुळे माझा आणि दानवेदादांचा एकमेकांकडे जाणारा रस्ताही मोकळा झाल्याची टिप्पणी खोतकर यांनी केली! राजकारणात मतभेद होत असतात. पण आमच्यात कधीच मनभेद झालेले नाहीत. किरकोळ मतभेदही दूर झाले असून राज्यात आणि केंद्रात महायुतीची सत्ता असल्यामुळे मी आणि दानवेदादा मिळून जालना शहराचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहणार आहोत. आवश्यक त्यावेळी दादांचे मार्गदर्शनही आपण घेणार आहोत. अंबड येथील फिल्टर प्लांट असो की घाणेवाडीचा सोलार प्रकल्प, शहरातील कोणत्याही विकास कामांसाठी मी आमदार म्हणून महापौरांना पूर्ण सहकार्य करणार आहे. पालिकेच्या वतीने महापौरांनी विकासकामांचे प्रस्ताव दिल्यास नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे आपण प्रामाणिकपणे पाठपुरावा करू, अशी ग्वाही दिली. राजुर चौफुली येथील उड्डाण पुलाच्या खालील दोन्ही बाजूने रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती. या रस्त्यासाठी आपण अकोला डिव्हिजन कडून मजबुती करण्यासाठी संबंधित मुख्य अभियंता शेलार, अधीक्षक अभियंता नवले आणि कार्यकारी अभियंता चव्हाण यांना बोलून तो रस्ताही मंजूर करून घेतला आहे. लवकरच आम्ही दोघे त्या रस्त्याचे उद्घाटन करणार आहोत. तसेच महायुतीचे नगरसेवक म्हणून शिवसेनेच्या नगरसेवकांच्या प्रभागातही समान निधी दिला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर म्हणाले की, माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब दानवे आणि आमदार अर्जुनराव खोतकर जिल्ह्याच्या राजकारणात अनेक वर्ष एकत्रित काम करीत आहेत. जिल्ह्याच्या पान २ वर

# जालना पोलीस दलाची सुवर्णकन्या लुसी अनंतात विलीन

## शासकीय इतमामात अखेरचा निरोप

**जालना । प्रतिनिधी -** जालना पोलीस दलाच्या गुन्हे शोध शाखेतील अत्यंत कार्यक्षम आणि अनेक क्लिष्ट गुन्ह्यांची उकल करण्यात मोलाची भूमिका बजावणारी गुन्हे शोधक श्वान लुसी हिचे शुक्रवारी (३ एप्रिल २०२६) दीर्घ आजाराने निधन झाले. तिच्या निधनामुळे पोलीस दलात हळहळ व्यक्त होत असून, पोलीस मुख्यालयात अत्यंत शोकाकुल वातावरणात आणि पूर्ण शासकीय इतमामात तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**कर्तव्यदक्ष आठ वर्षांचा प्रवास**

सन २०१८ मध्ये जालना पोलीस दलात रुजू झालेल्या लुसीने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अल्पावधीतच पोलीस दलाचा वश्विास संपादन केला होता. तिने पुणे येथील श्वान प्रशिक्षण केंद्रातून नऊ महिन्यांचे खडतर गुन्हे शोधक मूलभूत प्रशिक्षण पूर्ण केले होते. गेल्या आठ वर्षांपासून ती जालना पोलीस दलात आपली सेवा देत होती.

लुसीने आपल्या कार्यकाळात अनेक महत्वाच्या गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना दिशा दाखवली. विशेषतः: कदीम जालना पोलीस ठाणे: येथील एका अत्यंत गुंतागुंतीच्या खुनाच्या गुन्ह्यात लुसीने दिलेल्या सुगाव्यामुळे आरोपींच्या मुसक्या आवळण्यात यश आले होते.

मौजपुरी पोलीस ठाणे: चोरीच्या एका मोठ्या घटनेत लुसीच्या शोध कौशल्यामुळे मुद्देमाल जप्त करण्यात मोलाची मदत झाली होती.



''लुसी केवळ एक श्वान नव्हती, तर ती आमच्या दलाचा एक अविभाज्य भाग आणि कणा होती. अनेक कठीण प्रसंगात तिने आपल्या अफाट शोधशक्तीने तपासाला गती दिली. तिचे जाणे ही पोलीस दलाची मोठी हानी आहे.''
**- प्रभारी अधिकारी, श्वान पथक, जालना.**

**सुवर्ण पदकाची मानकरी**

तिच्या कौशल्याची दखल केवळ जिल्ह्यानेच नव्हे तर विभागानेही घेतली होती. सन २०२५ मध्ये आयोजित विभागीय पोलीस कर्तव्य मेळाव्यात चार जिल्ह्यांतील श्वानांमधून लुसीने सुवर्ण पदक पटकावून जालना पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला होता.

**आजारपणाशी झुंज अपयशी**

गेल्या काही काळापासून लुसी लिपोसारकोमा () या दुर्धर आजाराने ग्रस्त होती. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली तिच्यावर उपचार सुरू होते, मात्र शुक्रवारी सकाळी तिची प्राणज्योत मालवली.

**शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर लुसीला शोक सलामी देण्यात आली. हवेत फैरी झाडून तिला अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी उपस्थित पोलीस अधिकारी आणि अंमलदारांनी पुष्पचक्र अर्पण करून तिला श्रद्धांजली वाहिली. यावेळी प्र. पोलीस उपअधीक्षक (गृह) जालना, प्रभारी अधिकारी ( व श्वान पथक), तसेच , श्वान पथक आणि पोलीस मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजेवाडी शाळेचा परसबाग पॅटर्न ; ओसाड जागेत फुलवले नंदनवन

## शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना मिळतेय कृषी धडे

**बदनापूर । प्रतिनिधी -** बदनापूर तालुक्यातील राजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक आणि ग्रामस्थांनी लोकसहभागातून शाळेच्या ओसाड जागेत एक सुंदर परसबाग फुलवली आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम आज आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

काही काळापूर्वी ज्या ठिकाणी कचरा आणि घाण होती, ती जागा शाळेने लोकसहभागातून स्वच्छ केली. तेथे काळी माती टाकून आणि योग्य नियोजन करून भाजीपाल्याची लागवड करण्यात आली आहे. शाळेच्या या कल्पकतेमुळे परिसरात आज हिरवेगार नंदनवन पाहायला मिळत आहे.



या परसबागेत केवळ शोभेची झाडे नसून, आरोग्यासाठी उपयुक्त असा ताजा भाजीपाला पिकवला जात आहे. यात प्रामुख्याने टोमॅटो, बटाटे, वांगी, पालक, मेथी, कोथिंबीर चुका आणि विविध प्रकारच्या पालेभाज्यांचा समावेश आहे. बागेच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी आकर्षक पाण्याचे कारंजे देखील बसवण्यात आले असून संरक्षणासाठी तारेचे आणि कापडाचे मजबूत कुंपण करण्यात आले आहे.

केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकायला मिळावे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. आठवड्यातून एकदा विद्यार्थ्यांना या बागेत नेऊन रोपांच्या जाती, त्यांची वाढ आणि निगा कशी राखायची, याची माहिती दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाप्रती प्रेम आणि श्रमाची ओढ निर्माण होत आहे. नुकतीच बदनापूरचे शिक्षण विस्तार अधिकारी नारायण पान २ वर

# भाजपा च्या स्थापना दिनानिमित्त भाजपा जिल्हा कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. ०६ एप्रिल २०२६ रोजी भारतीय जनता पार्टी च्या स्थापनेला ४६ वर्ष पूर्ण होत असल्याने जिल्हा भारतीय जनता पार्टी च्या वतीने जिल्हा कार्यालयात सकाळी ९.०० वाजता भाजपा जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे व जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या शुभहस्ते व जालना जिल्हा लोकनेते मा.रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, आ.संतोष पाटील दानवे, माजी आ.विलासबापू खरात, माजी आ. कैलासजी गोरंट्याल, महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत घनसावंगी विधानसभा प्रमुख सतीश घाटगे, सभापती अशोक पांगारकर, सौ. संध्या देठे, सौ. पूनम स्वामी, ॲड भगवान चांदोडे, सौ. माया जोशी, सौ. ऐश्वर्या आडेकर सौ. भाग्यश्री जोगस, सौ. वर्षा राऊत, श्री. कपिल भूरेवाल, सौ. अनामिका पांगारकर, सौ. पदमा मानधनी या प्रमुख मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आ.बबनरावजी लोणीकर स्थापना दिनाच्या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तरी जालना जिल्ह्यातील सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सर्व नगरसेवक, आजी-माजी जि.प.प.स.न.प.सदस्य यांनी भारतीय जनता पार्टी स्थापना दिनाच्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असे आवाहन भारतीय जनता पार्टी, जालना महानगर च्या वतीने करण्यात येते.

# शिवसेना युवासेना प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे व नवनियुक्त जिल्हाप्रमुखांच्या सत्कारांचे आयोजन

## जास्तीत-जास्त शिवसेना पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अंबड, बदनापूर, जालना विधानसभा मतदार संघात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे व नवनियुक्त जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव व महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रुपम रमेश घुगे,जिल्हा समन्वयक परशराम (पी. एन.)यादव यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले असून सर्व शिवसैनिक,प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान सर्व कार्यक्रम ५ एप्रिल रोजी होणार आहेत.

यावेळी शिवसेना जिल्हासंघटक भानुदास घुगे,जिल्हा समनवयक परशराम यादव, महिला आघाडीच्या नवनियुक्त जिल्हासंघटक रुपमताई रमेश घुगे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे,भगवान कदम, मुरलीधर शेजुळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी आपणास विनंती आहे की, आपण सर्व पदाधिकाऱ्यांनी ५ एप्रिल रविवार रोजी वेळ दुपारी ३ वाजता स्थळ उगळे पाटील यांचे मातोश्री कृषी पर्यटन केंद्र लालवाडी जालना - अंबड रोड येथे या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन अंबड तालुकाप्रमुख दिनेश काकडे यांनी केले आहे. तर बदनापूर येथे संत सावता माळी सभागृहात सायंकाळी ११ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीस जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवान कदम, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रूपमताई घुगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

तर जालना येथील शासकीय विश्रामगृह ४८८ अंबड चौफुली येथे दुपारी १ वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले असून यावेळी जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, भानुदास घुगे, मुरलीधर शेजुळ,भगवान कदम, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रूपम घुगे,जिल्हा समनवयक परशराम (पी. एन.) यादव, शहरप्रमुख दिपक रंनावरे,संदीप झारखंडे, शहर संघटक चेतन भुरेवाल यांची उपस्थिती राहणार आहे.या सर्व कार्यक्रमास कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची उपस्थित राहावे, आवाहन जिल्हा शिवसेना व युवासेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# संपादकीय पान

## मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घाला

सोशल मीडिया हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आजचे युगच सोशल मीडियाचे युग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण आज सोशल मीडिया ही जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण सोशल मीडियावर सक्रिय आहेत. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे आणि या स्मार्ट फोन मध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, शेअर चाट, स्नॅप चाट, यु ट्यूब अशा अनेक सोशल मीडियावर साईट आहेत. या सोशल मीडिया साईटवर सतत सक्रिय राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवण्यासाठी जो तो धडपडत असतो. विशेषतः किशोवयीन आणि तरुण मुलांमध्ये या सोशल मीडिया साईटची भलतीच भुरळ आहे. आजची युवा पिढी आपला सर्वाधिक वेळ सोशल मीडियावरच व्यतीत करते. एका सर्व्हेक्षणानुसार आपल्या देशातील मुले दररोज सरासरी पाच तास सोशल मीडियावर व्यतीत करतात. याचाच अर्थ आपली मुले सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. ही मुले दिवसभर उपाशी राहू शकतील पण सोशल मीडिया पासून दूर राहू शकणार नाही. विशेष म्हणजे केवळ तरुण मुलेच नाही तर शाळकरी मुले देखील सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. तज्ज्ञांनी अनेकवेळा इशारा देऊनही त्याचा वापर कमी झालेला नाही उलट वाढतच चालला आहे. सोशल मीडियामुळे तर त्याच्या वापर उच्चांकी पातळीवर पोहचला आहे. त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत. सोशल मीडियाचा अती वापरामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. सोशल मीडियामुळे मुले हिंसक बनू लागले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील तणाव वाढला आहे. मुलांना डोळ्यांच्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत अनेक मुलांना लहान वयातच चष्मा लागल आहे. सोशल मीडियामुळे मुले मैदानी खेळ विसरले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील संवाद हरपला आहे. मुले एकलकोंडी बनली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सोशल मीडियामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला आहे. मुलांची एकाग्रता भंग झाली आहे. मुले चीडचीडी बनली आहेत म्हणून किमान शाळकरी मुलांना तरी सोशल मीडिया पासून दूर ठेवावे असे तज्ज्ञ सांगत आहेत त्यामुळे अनेक शाळांनी मुलांना शाळेत मोबाईल वापरण्यास बंदी घातली आहे मात्र शाळा सुटल्यावर मुले सोशल मीडियाचा वापर करतातच म्हणून मुलांच्या सोशल मीडिया वापरावर कायद्यानेच बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली आहे. भारत सरकारने अजून तरी शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी आली नसली तरी कर्नाटक सरकारने मात्र या संदर्भात सकारात्मक पाऊल टाकत १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

**पान १ वरुन**

### प्रस्ताव तुम्ही द्या ...

विकासात त्यांचा मोठा सहभाग आहे. त्यांच्यात मतभेद झाले की कार्यकर्त्यांची अडचण होते. परंतु शहराच्या आणि जिल्ह्याच्या विकासासाठी या दोन नेत्यांनी एकत्र राहिले पाहिजे. ते एकत्र राहिले तर कोणीही विकासकामात आडकाठी आणू शकत नाही,असे सांगितले. जालना आणि भोकरदनमध्ये एवढ्याच रस्त्याचा अडथळा होता आणि आज त्या रस्त्याचे काम सुरू झाल्याने तोही दूर झाला आहे, अशी मार्मिक टिप्पणी केली.
महापौर वंदना मगरे म्हणाल्या, महापौर पद मिळाल्यानंतर प्रथमच मला एवढ्या मोठ्या कामाची उद्घाटन करण्याची संधी मिळाली याचा विशेष आनंद होत आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण भेदाभेद करणार नसून विकासासाठी सर्वांचे सहकार्य घेऊ, असे स्पष्ट केले. यावेळी व्यासपीठावर महापौर वंदनाताई मगरे शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर उपमहापौर राजेश राऊत नगरसेवक भास्कर आबा दानवे पंडित दादा भुतेकर स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे फिरोज लाला लाला तांबोळी मनपाविरोधी पक्ष नेते कमलेश खरे गटनेता दीपक राठोड नगरसेवक अमोल ठाकूर संजय डुकरे दुर्गेश काठोटीवाले दिनेश भगत योगेश भगत अर्जुन गेही सिद्धिविनायक मुळे आदी उपस्थित होते.
संचालन शुभम टेकाळे यांनी केले.तर आभारविभाग प्रमुख मनोज लाखोले यांनी मानले. कार्यक
नानासाहेब वानखेडे, अशोक सांबरे अक्कूलाल , विभाग प्रमुख मनोज लाखोले, योगेश रत्नपारखे, आदेश कोटेजा,, ताहेरखान ,संतोष रासवे, प्रल्हाद माऊली हरबक, बिलाल भाई, उपजिल्हाप्रमुख शेख नजीर भाई, माजी नगरसेवक राम सतकर, उज्वलाताई फोपलीया, भगुलाल भगत, आकाश जगताप ,रवींद्र हरबक, गोपीकिशन घोंगडे,अंकुश पाचफुले ,दुर्गेश काठोटीवाले, विरोधी पक्षनेता मनपा ,राजेंद्र परदेशी, शिवसिंग तिलवारवाले, संजय गायकवाड, किरण शिरसाट, शिवाजी लाड ,संजय कांबळे ,सखाराम लंके, मुज्जू भाई ,बंडू एखंडे, संतोष शिकारे, स्मिता पवार कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जालना इत्यादी मान्यवर व कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठ्या संख्येने महायुतीच्या कार्यकर्त्यांची व नागरिकांची उपस्थिती होती.

### राजेवाडी शाळेचा ...

कुमावत यांनी या शाळेला भेट देऊन परसबागेची पाहणी केली. शाळेचा हा कायापालट पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले व मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंदांचे विशेष कौतुक केले. शाळा प्रगतीच्या योग्य दिशेने वाटचाल करत आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय समितीचे अध्यक्ष रणजित शेजुळ, उपाध्यक्ष प्रतापसिंह डेहंगळ, ग्रामसेवक श्रीमती मेहेत्रे , प्रताप गुसिंगे आणि सर्व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. शाळेचे मुख्याध्यापक जगत घुगे, शिक्षक परमेश्वर मोरे, वनिता आचार्य, गंगा टेपले आणि प्रज्ञा चौधरी, शालेय शिक्षण समिती आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमातून ही बाग बहरली आहे. गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके, डी.एन. क्षीरसागर आणि केंद्रप्रमुख शंकरसिंग ठाकूर यांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे.





जालना शहरातील महात्मा फुले मार्केट येथे उघडे डिप्पा असून येथील ये जा करणाऱ्या नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे आणि जीवित हानी ही होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी स्थानिकांनी म्हटले आहे

(छायाचित्र जावेद तांबोळी )

# डोनाल्ड ट्रम्प मानवतेचा हत्यारा ही बाब अमेरिकेच्या ८० लक्ष नागरिकांनी जगाला पटवून दिली

जगात अनेक राजे-महाराजे झालेत, हिटलर सारखे क्रूर शासक सुद्धा झाले.परंतु डोनाल्ड ट्रम्प यांनी या संपूर्ण हद्दी पार करून मानव,पशुपक्षी, वित्तीय हाणी या संपूर्ण बाबींची हद्द पार केल्याचे दिसून येते.डोनाल्ड ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून दगा दिला ही बाब जगजाहीर आहे आणि तेच काम अमेरिका इराण सोबत युद्ध करून इस्त्रायलच्या बाबतीत करू शकते.कारण अमेरिका कोणाचाच झाला नाही आणि होणार सुध्दा नाही ही बाब त्यांच्या वागणुकीवरून स्पष्ट दिसुन येते.अमेरिकेने सुपर पॉवरच्या नावाखाली जगाला अंधक्कारात नेवून ठेवले आहे व जगातील मित्र देशांना धोका देत आहे.डोनाल्ड ट्रम्प सांगतात की आम्ही जी कारवाई इराणवर करीत आहोत ही मानवतेच्या आणि जगाच्या कल्याणासाठी करीत आहो अशा भुलथापा मारून जगातील देशांची दिशाभूल करण्याचे काम डोनाल्ड ट्रम्प करीत आहे. डोनाल्ड ट्रम्प या युध्दाच्या माध्यमातून इराणला नमविण्याचा प्रयत्न करीत आहे.परंतु इराण अमेरिका-इस्रायलला जशास तसे उत्तर देवून दोघांनाही घाम सोडून त्यांची जागा दाखवित आहे.या युध्दामागचा अमेरिकेचा एकच उद्देश आहे तो मिडलिस्टमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे व तेल कंपन्यांनवर आपला कब्जा व्हावा याकरीता इरानच्या ४५० किलो युरेनियमवर त्याचा डोळा आहे.कारण इराणने जर अनुबॉम्ब बनविला तर उत्तर कोरियाचा तानाशाह किंग्ज जॉन उन सारखी वारंवार धमकी इराण आपल्याला नेहमीच देईल अशी भिती अमेरिकेला वाटत आहे. त्याचप्रमाणे या युध्दाच्या माध्यमातून खर्ग आणि होर्मुझवर आपले वर्चस्व रहावे व खाडी देश आपल्या नियंत्रणात राहून तेल उद्योगांवर आपली पकड मजबूत करण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी हे विनाशकारी युद्ध छेडल्याचे दिसून येते. परंतु डोनाल्ड ट्रम्प यांच्या हेकडीपणामुळे आणि अतिरेकामुळे संपूर्ण मिडलिस्ट युद्धाच्या खाईत होरपळत आहे यात आबालवृद्ध, विद्यार्थी, मुल,निरअपराध नागरिक,पशुपक्षी यांना आपले प्राण मुकावे लागत आहे. या युध्दात इराणचा काहीच दोष नाही. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणला मुद्दाम युद्धासाठी उकसविले आणि आज त्याचा जगावर विपरीत परिणाम होऊन आर्थिक, मानवीय, वित्तीय हाणी दिवसेंदिवस गंभीर वाढत आहे. सोबतच या युद्धामुळे रेडियेशन वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.अमेरिका आणि इस्त्रायलला वाटत होते की हे युद्ध ४ ते ५ दिवसांत संपेल परंतु इराण,अमेरिका-इस्रायलचा बाप निघाला आणि अनेक मोर्चावर अमेरिका-इस्त्रायलला परास्त करून जशास तसे उत्तर देत आहे ही इराणच्या दृष्टीने गौरवास्पद बाब आहे. कारण छोटासा देश बलाढ्य देशाला जेव्हा टक्कर देतो तेव्हा बलाढ्य देशांची घाबरगुंडी उडते.या संपूर्ण युद्धजन्य परिस्थिती वरून लक्षात येते की डोनाल्ड ट्रम्प आणि बेंजामिन नेतन्याहु यांनी सापाच्या बिळात हात टाकून मोठी चूक केली असावी.कारण आज एक महिना झाला तरी इराण अमेरिका-इस्त्रायलवर वार-पलटवार सुरूच आहे त्याच्या बहादुरीची सराहना केली पाहिजे.इराणचे टॉप लिएंडर व कमांडर मारल्या गेले तरीही इराण थोडासाही डगमगला नाही हा इराणचा प्लस पॉइंट आहे.माझ्यामते अमेरिकेने हे युद्ध ताबडतोब थांबविले पाहिजे अन्यथा इराण अमेरिकेला अनेक गंभीर जखमा देऊ शकतो.हे युद्ध थांबविण्यासाठी जगाने अमेरिका -इस्त्रायलवर दबाव टाकला पाहिजे.कारण या युध्दाचे समर्थन नाटोसह जगातील कोणीही करायला तयार नाही.इराण-अमेरिका-इस्त्रायल युद्ध दिवसेंदिवस अक्राळविक्राळ रूप घेत आहे आणि याचा परिणाम पुढे चालून महाभयानक होण्याची दाट शक्यता आहे.कारण अमेरिका-इजरायलने इराणला घायाळ करून अनेक जखमा दिल्या आहेत.त्यामुळे इराणकडून युद्ध थांबने शक्य नाही याकरिता हे युद्ध अमेरिकाच थांबवू शकतो अन्यथा याचा गंभीर परिणाम अमेरिका-इस्त्रायलसह मिडलिस्ट व संपूर्ण जगाला भोगावा लागेल.कारण अमेरिकन जनतेकडुन युद्धाचा कडाडून विरोध होत आहे याचाच अर्थ असा की, अमेरिकन जनता डोनाल्ड ट्रम्प यांच्या युध्दाच्या कारवाईच्या विरोधात असल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या एक महिन्याच्या काळात युध्दामध्ये मृतांची सरकारी आकडेवारी हजारोंच्या संख्येने सांगितली जात असली तरी लाखोंच्या संख्येने मानवीय हाणी झाली आहे व अरबो-खरबो रूपयांची वित्तीय हाणी झाली आहे.सध्याच्या परिस्थितीत घातक क्षेपणास्त्रे,ड्रोन आणि विध्वंसक शत्रसामुग्रीचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे हे सर्व विनाशकारीचे लक्षणं आहेत. पश्चिम आशियात जनुकाय क्षेपणास्त्र-ड्रोनचा पाऊस पडत आहे की काय असे सुरू आहे. ट्रम्पच्या चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका-युरोपमध्ये ३३०० ठिकाणी डोनाल्ड ट्रम्पच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू आहे आणि याचे पडसाद जगभर उमटायला सुरुवात झाली आहे.डोनाल्ड ट्रम्प विरोधी आंदोलन फक्त अमेरिकेपुरते सिमित रहाले नसुन याचे पडसाद जगातील अनेक देशात पसरले आहे.कारण या युध्दाचा परिणाम बेरोजगारी व महागाईच्या रूपात जगातील प्रत्येक व्यक्तीवर पडत आहे. त्यामुळे सावधान ट्रम्प आतातरी युद्ध थांबवा अन्यथा जगाचा विनाश अटळ आहे.या युध्दात नाटोसह अनेक मित्र देशांनी डोनाल्ड ट्रम्पला मोठा धक्का दिला असून ठेंगा दाखवला आहे हीच डोनाल्ड ट्रम्पची मोठी हार आहे.अमेरिकेची दादागिरी लक्षात घेता सर्वच देशांनी इराणच्या बाजूने उभे रहायला हवे व शांततेने तोडगा काढायला हवा.अमेरिकेने इराणच्या अणू कार्यक्रमाच्या निगडित ठिकाणावर हल्ला केल्याने युद्ध आणखी चिघळले आहे.यामुळे इराणने अमेरिकी तेल कंपन्यांना टार्गेट करण्याची धमकी दिली आहे.यामुळे तेलाचे दर आभाळाला टेकण्याची दाट शक्यता आहे.अमेरिकेला मित्र देशांचे मोठे झटके पडत आहे अमेरिकेचे मित्र देश फ्रान्स, इटली, स्पेन आणि स्वित्झर्लंडने अमेरिकी सैन्य विमानांना आपले एअर बेस वापरण्यास नकार दिल्याने ट्रम्प एकाकी पडले आहेत आणि हा अमेरिकेसाठी मोठा झटका आहे. अमेरिकेला मित्र देशांकडून होर्मुझ सामुद्रधुनी संदर्भात मदत न मिळत असल्याने ट्रम्प तिलमिला झाले आहे आणि त्यांनी मित्र देशांना आपली नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की,''जा आणि स्वतः तेल मिळवा.''कारण आमच्याकडे भरपूर तेल आहे. अमेरिकेने इराणच्या महत्वपूर्ण ठिकाणांवर हल्ला केल्याने इराणच्या तळपायाची आग मस्तकात गेली आहे त्यामुळे इराणने अमेरिकन कंपन्यांना लक्ष करण्यात येईल असा इशारा इराणच्या ''रिव्होल्युशनरी गार्ड''ने (आयआरजी सी) दिला आहे.यात मायक्रोसॉफ्ट,गुगल,ॲपल,इंटेल, आयबीएम, टेस्ला, आणि बोइंगसह १८ कंपन्यांचा यात समावेश असल्याचे वृत्त रॉयटर्सने दिले आहे.यावरून स्पष्ट होते की, अमेरिका इराणला जेवढे जखमा देईल त्यापेक्षा जास्त घाव आयआरजीसी अमेरिका व इस्रायलला देईल ही बाब स्पष्ट झाली आहे.त्यामुळे अमेरिकेने युध्दाला सुरुवात केली आणि आता त्यामुळे हे विनाशकारी युद्ध अमेरिकेनेच स्वतःच थांबविले पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पालकांचे राजकारण आणि मुलांचे शिक्षण

घर म्हणजे प्रेम, आधार आणि संस्कारांची जागाअसं आपण मानतो. पण थोडं वास्तवात डोकावलं, तर अनेक घरांमध्ये एक वेगळीच व्यवस्था चालू असतेती म्हणजे सूक्ष्म राजकारण! आणि गंमत म्हणजे, या राजकारणाचा सर्वात जास्त परिणाम ज्यांच्यावर होतो, ती म्हणजे घरातील मुलं.
राजकारण म्हटलं की आपल्याला संसद, निवडणुका, पक्ष आणि भाषणं आठवतात. पण घरातलं राजकारण अधिक सूक्ष्म, अधिक भावनिक आणि अधिक परिणामकारक असतं. इथे ''आई पक्ष'' आणि ''बाबा पक्ष'' असे दोन गट तयार होतात, आणि मुलं ही या दोन्ही पक्षांमध्ये ''स्विंग वोटर'' बनतात! परिस्थितीनुसार त्यांची भूमिका बदलत राहते.
उदाहरणार्थ, आईने अभ्यासासाठी ओरडलं, की मुलगा लगेच बाबांकडे धाव घेतो''बाबा, आई खूप ओरडते!'' बाबा लगेच मवाळ भूमिका घेतात''अगं, लहान आहे तो.'' त्या क्षणी बाबा ''मुलांचा हिरो'' बनतात. दुसऱ्या दिवशी बाबा रागावले, की मुलगा आईकडे''आई, बाबा खूप स्ट्रिक्ट आहेत!'' आई लगेच संरक्षण देते''ठीक आहे, मी बोलते त्यांच्याशी.'' आता आई हिरो! अशा प्रकारे मुलं दोन्ही बाजूंना खेळवत असतात.
या सगळ्या प्रक्रियेत मुलं एक महत्त्वाचा धडा शिकतातनियम पाळण्यापेक्षा परिस्थिती हाताळणं महत्त्वाचं! म्हणजेच, ''काय बरोबर आहे?'' यापेक्षा ''कोणाकडे गेलं की काम होईल?'' हा विचार त्यांच्या मनात बसतो. हेच घरगुती राजकारणाचं पहिलं पाऊल असतं.
पालकांना वाटतंआपण मुलांचं भलं करतोय. आईला वाटतं''मी शिस्त लावतेय.'' बाबांना वाटतं''मी प्रेम देतोय.'' पण जेव्हा या दोन गोष्टींमध्ये समन्वय नसतो, तेव्हा मुलं गोंधळतात. त्यांना समजत नाहीखरं काय आणि चुकीचं काय. आणि मग ते स्वतःचा मार्ग शोधतातजो बहुतेक वेळा ''सोप्पा मार्ग'' असतो!
घरातलं राजकारण फक्त ''आई आणि बाबा'' इतकंच मर्यादित नसतं. कधी कधी आजी-आजोबा, काका-काकू, किंवा मोठी भावंडंही यात सहभागी होतात. मग तर घर पूर्णपणे ''बहुपक्षीय लोकशाही'' बनतं! प्रत्येकाचा वेगळा नियम, वेगळी अपेक्षा आणि वेगळी भूमिका. मुलं मग कोणत्या पक्षात जावं, हे ठरवत बसतात.
या सगळ्यात सर्वात मोठा तोटा होतो तो मुलांच्या मूल्यव्यवस्थेचा. कारण त्यांना स्पष्ट संदेश मिळत नाही. एकाच गोष्टीवर दोन वेगवेगळ्या प्रतिक्रिया मिळतात. उदाहरणार्थ, आई म्हणते''मोबाईल कमी वापर,'' आणि बाबा म्हणतात''ठीक आहे, थोडा वेळ चालेल.'' मुलगा लगेच समजतो''नियम परिस्थितीनुसार बदलतात.'' मग तो स्वतःच्या सोयीने नियम ठरवतो.
या घरगुती राजकारणाचा आणखी एक परिणाम म्हणजे मुलांचा आत्मविश्वास कमी होणं. कारण त्यांना स्पष्ट दिशा मिळत नाही. कधी कौतुक, कधी टीकाकधी प्रेम, कधी रागया सगळ्यात ते गोंधळतात. आणि मग ते निर्णय घेण्यात कमकुवत होतात.
थोड्या विनोदी पद्धतीने पाहिलं, तर घरातल्या या राजकारणाला काही ''पदे'' सुद्धा देता येतील. आई''गृह मंत्री'', बाबा''वित्त मंत्री'', आणि मुलं''जनता''! आणि जनता नेहमीच विचारते''आज कोणाचा निर्णय अंतिम आहे?'' कधी आईचा आदेश लागू, कधी बाबांचा व्हेटो! आणि मुलं त्यानुसार आपली रणनीती बदलतात.
पण या सगळ्या विनोदामागे एक गंभीर प्रश्न आहेआपण मुलांना काय शिकवत आहोत? जर घरातच नियमांमध्ये सातत्य नसेल, परस्पर आदर नसेल, आणि एकसंध भूमिका नसेल, तर मुलं कशी शिस्तबद्ध आणि जबाबदार बनतील?
पालकांनी हे लक्षात घ्यायला हवं की, मुलांसमोर एकमेकांना कमी लेखणं, विरोधी भूमिका घेणं किंवा एकमेकांच्या निर्णयाला कमकुवत करणं हे थेट मुलांच्या मनावर परिणाम करतं. मुलं लगेच ओळखतात''इथे एकमत नाही.'' आणि मग ते त्याचा फायदा घेतात.
यावर उपाय काय? उपाय खूप सोपा आहे, पण तो अमलात आणणं थोडं कठीण आहेसमन्वय. आई आणि बाबांनी एकत्र बसून ठरवायला हवंमुलांसाठी कोणते नियम असतील, कोणत्या गोष्टींवर कडकपणा ठेवायचा आणि कुठे सवलत द्यायची. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजेमुलांसमोर एकमेकांचा आदर ठेवायचा.



मतभेद असणं स्वाभाविक आहे. पण ते मुलांसमोर मांडण्याची पद्धत महत्त्वाची आहे. जर मतभेद शांतपणे आणि सन्मानाने हाताळले गेले, तर मुलंही तेच शिकतात. पण जर वाद, आरोप आणि अपमान यामध्ये मतभेद व्यक्त झाले, तर मुलं नातेसंबंधांबद्दल चुकीचा दृष्टिकोन तयार करतात.
घरातलं राजकारण पूर्णपणे टाळणं कदाचित शक्य नाही. पण त्याला योग्य दिशा देणं शक्य आहे. जर ते सकारात्मक असेलम्हणजे निर्णय सामूहिक असतील, संवाद स्पष्ट असेल आणि आदर टिकून असेलतर ते मुलांसाठी एक चांगला अनुभव ठरू शकतो.
शेवटी, थोडक्यात सांगायचं तर घरातलं राजकारण जर समन्वयाने चाललं, तर ते व्यवस्थापन बनतं; पण जर ते विसंवादाने चाललं, तर ते गोंधळ बनतं.
म्हणूनच प्रत्येक पालकाने स्वतःला विचारावंआपल्या घरात राजकारण चालतंय की व्यवस्थापन? कारण मुलं त्यातूनच शिकत आहेत.

**लेखकः डॉ. भारत कऱ्हाड**

# दिवाणी न्यायालयाचा निकाल अंतिम, सावकारी कायद्याखालील अधिकाऱ्यांना तो बदलण्याचा अधिकार नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना । प्रतिनिधी -** मालमत्तेच्या व्यवहारासंबंधी दिवाणी न्यायालयाने एकदा निकाल दिल्यानंतर, त्याच व्यवहाराला सावकारी कायद्यांतर्गत आव्हान देता येत नाही किंवा दिवाणी न्यायालयाचा निर्णय बदलता येत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एका प्रकरणात दिला आहे. या निकालामुळे दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित झाले असून, सावकारी कायद्याचा गैरवापर करून कायदेशीर मालमत्ता व्यवहार रद्द करण्याच्या प्रयत्नांना चाप बसेल, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात, एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीकडून २०,००० रुपयांचे कर्ज घेतले होते आणि त्याच्या सुरक्षेसाठी आपल्या शेतजमिनीचे खरेदीखत करून दिले होते. नंतर, कर्जदाराने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे सावकारी कायद्याच्या कलम १८ अंतर्गत तक्रार केली की, हा व्यवहार खरेदीचा नसून सावकारीचा होता. अधिकाऱ्यांनी चौकशी करून तो व्यवहार सावकारीचा असल्याचे ठरवले आणि संबंधित खरेदीखत रद्द करून मालमत्ता मूळ मालकाला परत करण्याचे आदेश दिले. या आदेशाला मालमत्ता खरेदी करणाऱ्या व्यक्तीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

याचिकाकर्त्याच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला की, या प्रकरणावर आधीच दिवाणी न्यायालयात सुनावणी झाली होती. दिवाणी न्यायालयाने खरेदीखत कायदेशीर ठरवून याचिकाकर्त्याच्या बाजूने कायमस्वरूपी मनाई हुकूमाचा आदेश दिला होता. दिवाणी न्यायालयाने एकदा व्यवहार कायदेशीर ठरवल्यानंतर, सावकारी कायद्याखालील अधिकाऱ्यांना त्याच मुद्द्यावर पुन्हा चौकशी करून वेगळा निर्णय देण्याचा अधिकार नाही. हा दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप आहे. हा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.

या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि स्वागतार्ह आहे. यामुळे कायद्याच्या राज्याची संकल्पना अधिक दृढ झाली आहे. अनेकदा सावकारी कायद्यातील तरतुदींचा वापर करून दिवाणी न्यायालयाने वैध ठरवलेले व्यवहारही रद्द करण्याचे प्रयत्न केले जातात. या निकालामुळे अशा प्रवृत्तींना आळा बसेल. दिवाणी न्यायालयाचा निर्णय हा अंतिम मानला पाहिजे आणि इतर कोणत्याही प्राधिकरणाला तो रद्द करण्याचा किंवा त्यावर फेरविचार करण्याचा अधिकार नाही, हे या निकालाने स्पष्ट केले आहे.''

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''हा निकाल भानुदास विरुद्ध महाराष्ट्र राज्य, २०२३ या प्रकरणातील निकालाचा पुनरुच्चार करतो. नागरिकांनी मालमत्तेचे व्यवहार करताना ते कायदेशीर आणि नोंदणीकृत असल्याची खात्री करावी. मात्र, एकदा दिवाणी न्यायालयाने एखाद्या व्यवहाराला कायदेशीर मान्यता दिल्यानंतर, त्याला इतर कोणत्याही मंचावर आव्हान देणे हे कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर ठरते. या निकालामुळे खऱ्या मालमत्ता खरेदीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.''

उच्च न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, जिल्हा उपनिबंधकांनी दिलेला आदेश दिवाणी न्यायालयाच्या निकालाच्या विरोधात होता आणि तो त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर होता. त्यामुळे, न्यायालयाने जिल्हा उपनिबंधक आणि विभागीय सहआयुक्तांनी दिलेले सर्व आदेश रद्द केले. या निर्णयामुळे, दिवाणी न्यायालयाच्या आदेशाचे पावित्र्य आणि श्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# जालना शहरात गुड फ्रायडे निमित्त प्रार्थना व भक्ती संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** गुड फ्रायडे' निमित्त जालना शहरात विविध चर्चमध्ये भक्ती व प्रार्थनेचे कार्यक्रम श्रद्धापूर्वक पार पडले. मिशन हॉस्पिटल परिसरातील क्राईस्ट चर्च कॅथेड्रल तसेच नूतन वसाहत येथील टॉम डॉप्सन मेमोरियल चर्चमध्ये गुड फ्रायडे निमित्त विशेष प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मोठ्या संख्येने ख्रिस्ती समाज बांधवांची उपस्थिती होती.

टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च, नूतन वसाहत येथे झालेल्या भक्तीत व प्रार्थनेत मोठ्या संख्येने ख्रिश्चन समाजबांधव उपस्थित होते. या प्रसंगी रेव्ह. बिभीषण कांबळे यांनी गुड फ्रायडेच्या निमित्ताने प्रभू येशू ख्रिस्त यांच्या बलिदानावर आधारित प्रभावी उपदेश केला. बायबलनुसार, प्रभू येशू यांनी संपूर्ण मानवजातीच्या पापांसाठी क्रूसावर स्वतःचे बलिदान दिले आणि मानवाला तारणाचा मार्ग दाखवला, असे त्यांनी सांगितले.

प्रभू येशू ख्रिस्तांनी क्रूसावर जे सात शब्द उचारले होते त्या 'सात शब्दांवर' जॉर्ज उगले, प्रविण गायकवाड, सुनिता निर्मळ, यश निर्मळ, सनी कांबळे, नुतन नवगीरे, शिलाबाई कांबळे या सात वक्त्यांनी प्रत्येक शब्दावर सखोल भाष्य करत त्यामागील आध्यात्मिक अर्थ स्पष्ट केला. प्रत्येक वक्त्याने येशू ख्रिस्तांच्या बलिदान, क्षमा, दया, प्रेम आणि तारणाच्या संदेशावर प्रकाश टाकला.

गुड फ्रायडे निमित्त प्रभू येशू ख्रिस्त यांच्या शेवटच्या क्षणांचे स्मरण करण्यात आले. तसेच चर्चमध्ये भक्तिगीते सादर करण्यात आली. यामध्ये बालिका एस्तेर लोखंडे हिने 'मी वेचीले फुलांना काटे ख्रिस्ता मिळाले' हे भक्तिगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.संपूर्ण कार्यक्रमात श्रद्धा, शांतता आणि भक्तीचे वातावरण अनुभवायला मिळाले.

प्रार्थना व उपासना संपल्यानंतर सर्व भाविकांसाठी टॉम डॉप्सन मेमोरियल चर्च येथे प्रिती भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच लुकस लोखंडे यांनी भोजनावेळी भक्ती गीते सादर केले. यावेळी चर्चचा परिसर भक्तीमय झाला. प्रितीभोजनाची सुयोग्य व्यवस्था टॉम डॉप्सन चर्च तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आली होती.

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१३ एप्रिल २०२६ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगाबाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅपीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना, खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था, भांडवल उभारणी, मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१३ एप्रिल २०२६ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे, मिटकॉन, जालना यांनी केले आहे.

# मराठा सेवा संघाची आज जालन्यात मासिक बैठक

## विविध विषयांवर होणार चर्चा

**जालना । प्रतिनिधी -** मराठा सेवा संघाची जिल्हा कार्यकारिणी आणि सर्व तालुका कार्यकारिणींची महत्त्वपूर्ण मासिक बैठक उद्या, रविवार दि. ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सकाळी १०:३० वाजता भाग्यनगर, जुना जालना येथील मराठा सेवा संघाच्या कार्यालयात पार पडणार आहे.

मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री संतोष मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न होईल. या बैठकीत संघटनेच्या बांधणीसह सामाजिक उपक्रमांवर प्रामुख्याने चर्चा करण्यात येणार आहे.

बैठकीतील मुख्य विषय:

बैठकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या विषय पत्रिकेनुसार खालील बाबींवर चर्चा होईल:

कार्यवृत्तांत: मागील बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून त्याला मंजुरी देणे.

सदस्य नोंदणी: संघटनेच्या आजीवन सभासद नोंदणी मोहिमेचा वेग वाढवणे.

तालुका आढावा: जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यकारिणींच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेणे.

युवा मार्गदर्शन: समाजातील होतकरू आणि गरजू तरुणांना करिअर व इतर क्षेत्रांत मार्गदर्शन करण्याबाबत नियोजन करणे.

अध्यक्षीय चर्चा: अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या सामाजिक व संघटनात्मक विषयांवर चर्चा करणे.

''जिल्ह्यातील संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आणि तरुणांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी ही बैठक महत्त्वाची आहे. तरी जिल्हा कार्यकारिणीतील सर्व सदस्य तसेच तालुका कार्यकारिणीचे अध्यक्ष व सचिव यांनी या बैठकीस वेळेवर उपस्थित राहावे,'' असे आवाहन जिल्हा सचिव शिवश्री बाबासाहेब कडोस यांनी केले आहे.




# रेल्वे स्थानक ते मंमादेवी मंदिरापर्यंत पारंपरिक मिरवणूक

## शंभर वर्षांची परंपरा आजही कायम



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग ठरलेला मंमादेवीचा 'बारा गाड्या' उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला मंमादेवीचा बारा गाड्या रेल्वे स्थानक मधुबन कॉलनी डबल जिम आदी भागाला लागून मार्गे मस्तगड पर्यंत संपन्न झाली आहे . मंमादेवीचा दरवर्षीप्रमाणे यंदाही रेल्वे स्थानक ते मंमादेवी मंदिरापर्यंत बारा गाड्यांची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. नवस पूर्ण झाल्यानंतर बारा गाड्या ओढण्याची ही परंपरा तब्बल शंभर वर्षांपासून सुरू असून आजही ती तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने जपली जात आहे.

भाविकांकडून मंमादेवी आणि काळूमाता यांच्याकडे विविध नवस केले जातात. हे नवस पूर्ण झाल्यानंतर देवीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'बारा गाड्या' ओढण्याची धार्मिक प्रथा पाळली जाते. वर्षानुवर्षे चालत आलेल्या या परंपरेमुळे भाविकांमध्ये विशेष आकर्षण आणि भक्तिभाव दिसून येतो. शहरातील अनेक कुटुंबांसाठी हा उत्सव श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक एकोप्याचे प्रतीक मानला जातो.

प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक महावीर ढाक्का आणि सुरेश राऊत यांच्या पुढाकारातून रेल्वे स्थानक ते मंमादेवी मंदिरापर्यंत 'बारा गाड्या' उत्साहात साजरा करण्यात आला. या मिरवणुकीत भाविकांचा मोठा सहभाग लाभला. पारंपरिक जयघोष, भक्तीमय वातावरण आणि उत्सवी जल्लोषामुळे संपूर्ण परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या वेळी बोलताना नगरसेवक महावीर ढाक्का यांनी सांगितले की, ''यावर्षी 'बारा गाड्या' उत्सव अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. पुढील वर्षी हा उत्सव यापेक्षाही अधिक भव्य, दिव्य आणि आकर्षक स्वरूपात साजरा करण्यात येईल,'' असे आश्वासन त्यांनी दिले.

या धार्मिक सोहळ्यास नगरसेवक विक्रांत ढाक्का, सुरेश राऊत, चंपालाल जाऊरे, सुभाष करंडे, सतीश जयस्वाल, नंद परदेशी, नंदकिशोर बगीनवाल तसेच मंमादेवी मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी श्रद्धा आणि उत्साहाने या परंपरेत सहभाग घेतला.

शहराच्या धार्मिक वारशाला जपणारा आणि श्रद्धेची साखळी पुढील पिढीपर्यंत पोहोचवणारा मंमादेवीचा 'बारा गाड्या' उत्सव यंदाही भक्तिमय वातावरणात संपन्न झाला असून, जालना शहरातील धार्मिक एकात्मता आणि सांस्कृतिक जपणुकीचे प्रतीक म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला कार्यकारिणीचा भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्या हस्ते सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला जालना-२०२६ च्या ४९ व्या कार्यकारिणीचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. शांताराम रायपुरे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांचा हार, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व व्याख्यानमाल यशस्वीरित्या होण्यासाठी शुभेच्छा दिल्या

भास्कर दानवे यांनी व्याख्यानमालेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक व वैचारिक उपक्रमांचे कौतुक केले. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक समता, बंधुता आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याचे कार्य व्याख्यानमालेने सातत्याने पुढे नेले असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, मा.सरचिटणीस देविदास देशमुख आदींची उपस्थिती होते.

# शाळांमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण उपयुक्त - गटशिक्षणाधिकारी चव्हाण

## मंठा येथे वैयक्तिक सुरक्षा शिक्षण प्रशिक्षण संपन्न



**मंठा । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारा वैयक्तिक सुरक्षा शिक्षण प्रशिक्षण मंठा येथे ४ रोजी यशस्वीरीत्या पार पडले.गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण व गटसमन्वयक के. जी. भाऊ राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथील अर्पण संस्थेने हे प्रशिक्षण घेतले. अर्पणचे प्रशिक्षक प्रशांत गीते, संकिता शिंदे, मनस्वी कुंडू व मिलिंद मुरूडकर यांनी शिक्षकांना सखोल प्रशिक्षण दिले. यावेळी केंद्रप्रमुख शिवाजीराव देशमुख, डी. ए. चव्हाण व के. व्ही. ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रशिक्षणामध्ये बाल लैंगिक शोषण ओळखणे, मानसिक आघाताची संकल्पना समजून घेणे तसेच वैयक्तिक सुरक्षा नियम यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर शिक्षकांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. सोबत प्रत्येक शिक्षकांना उपयुक्त माहितीचे किटही देण्यात आले.दिनांक १ ते ४ एप्रिल दरम्यान गट साधन केंद्र, मंठा येथे आयोजित या प्रशिक्षणात दोन गटांमधून एकूण ४७१ शिक्षकांनी सहभाग घेतला. या उपक्रमामुळे शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार असून शाळांमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे,असे गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांनी प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी सांगितले. प्रशिक्षणास गंगाधर वानोळे, किसन जयस्वाल, मुख्याध्यापक नंदकिशोर पारसकर यांच्यासह तालुक्यातील शिक्षक - शिक्षिका उपस्थित होत्या.

# परतूर उपविभागातील पोलीस पाटील यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीर संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** जालना पोलीस दलाच्या वतीने माननीय पोलीस अधीक्षक, अजयकुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक, आयुष नोपाणी यांच्या संकल्पनेतून उपविभाग परतूर येथे पोलीस पाटील यांचे प्रशिक्षण कार्यक्रम दि.०३/०४/२०२६, रोजी आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रशिक्षण व शिबिरात - पोलीस कायदा, पोलीस पाटील यांची जबाबदारी व कर्तव्य, सायबर गुन्हे, पोक्सो कायदा व जनजागृती बाबत माहिती देण्यात आली. तसेच त्यांच्या अडीअडचणी विषयी चर्चा करण्यात आली.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमात मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, रामेश्वर रेंगे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून पोलीस पाटील यांच्या कर्तव्ये, जबाबदाऱ्या, कायदा व सुव्यवस्था राखण्यातील भूमिका तसेच ग्रामीण भागातील संवेदनशील बाबी हाताळण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच पोलीस निरीक्षक, सुदाम भागवत, सहायक पोलीस निरीक्षक, गणेश सुरवसे, योगेश खटकळ, अतुल पाटील, श्रीमती आरती जाधव तसेच पोलीस उपनिरीक्षक, योगेश चव्हाण, संजय सोनवणे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन करून प्रशिक्षणार्थींना उपयुक्त माहिती दिली.

सदर प्रशिक्षणामुळे ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होण्यास निश्चितच मदत होईल.



# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षांना मोफत पाणी देण्याच्या उपक्रमाचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील जिल्हाधिकारी कार्यालय व सामाजिक न्याय भवन परिसरातील वृक्षांना उन्हाळ्यात पाण्याअभावी नुकसान होऊ नये आणि वृक्ष संवर्धनाला चालना मिळावी यासाठी युवा शक्ती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने मोफत पाणी देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमाबद्दल बोलताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, पर्यावरण संवर्धनासाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत आवश्यक आहेत. वृक्ष लागवड करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्यांचे संगोपन करणेही गरजेचे आहे. सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन वृक्षांचे रक्षण करण्यासाठी काम करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी कार्यालय तसेच सामाजिक न्याय विभागाच्या परिसरात लावलेल्या झाडांना नियमित पाणी मिळावे यासाठी संस्थांनी आठवड्यातून एकदा टँकरद्वारे पाणी देण्याचे नियोजन केले आहे. कडक उन्हाळ्यात झाडे जिवंत राहावीत आणि त्यांची वाढ कायम राहावी यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

सामाजिक न्याय भवन परिसरात दरवर्षी झाडांचा वाढदिवस साजरा केला जातो. त्या झाडांचे संवर्धन व्हावे यासाठी या उपक्रमातून विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

या वेळी युवा शक्ती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अमोल खरात, उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव अच्युत मोरे, कुलदीप गरड, मिलिंद खरात, विलास खरात, विशाल गवई आदी उपस्थित होते.

# मारोती मॅकेवार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



**परतूर । प्रतिनिधी -** ध्येय एज्युकेशन फाउंडेशन च्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार परतूर तालुक्यातील वाघाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मारोती दत्तराव मॅकेवार यांना प्रदान करण्यात आला आहे.दि.२९ रोजी पुणे येथील ग.दि.माडगुळकर नाट्यगृहात पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी.आ.अमित गोरखे, आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे, शिक्षणाधिकारी, डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्या उपस्थितीत ध्येय फाउंडेशनचे अध्यक्ष सुभाष शेंडगे व आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे यांच्या हस्ते मारोती मॅकेवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल श्रीफळ, स्मृतिचिन्ह, आणि प्रशस्तीपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.मॅकेवार हे शिक्षक विद्यार्थी प्रिय असून उपक्रमशील आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला आहे.या पुरस्कारा मुळे मॅकेवार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर आणि कृषी टीमचे मार्गदर्शन

# डिजिटल शेती शाळा संपन्न




**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासन कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, तानाजी देशमुख कृषी संजीवनी, पाणी फाउंडेशन आणि उमेद यांच्या संयुक्त विद्यमाने मा. डी. एल. मोहिते कृषी अधिकारी महाराष्ट्र कृषी तज्ज्ञ मा. विजय कोळेकर, संतोष वाळके यांच्या सहभागाने संपूर्ण राज्यभरात हवामान अनुकूल तंत्रज्ञानाच्या आधारे पेरणी पूर्व तंत्रज्ञान विशेष डिजिटल शेती शाळा राबवण्यात येत आहे.

शासनाच्या या उपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातही दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७:३० वाजता माणगाव तालुका कृषी अधिकारी श्री किरण पडवळकर आणि यांच्या कृषी टीम च्या मार्गदर्शनाखाली ऑनलाइन डिजिटल शेती शाळा सर्वत्र राबविण्यात आल्या. या डिजिटल शेती शाळेला माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या विशेष डिजिटल शेती शाळेमध्ये शेतकऱ्यांना पिकांची लागवड पद्धती, खत व्यवस्थापन, कीड रोग व्यवस्थापन व काढणी पश्चात तंत्रज्ञान याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. या शेती शाळेच्या माध्यमातून चालू वर्षी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा हेतू आहे. या डिजिटल शेती शाळेमध्ये प्रत्येक गावातून मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित राहिले. तसेच यापुढील डिजिटल शेती शाळेलाही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून शेतीचे नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी श्री. किरण पडवळकर साहेब यांनी माणगाव तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.